# उत्सवाची मार्गदर्शक तत्वे

## प्रेम / सेवा / उत्सव

**दृष्टिकोन** – प्रभू येशूचे व्यक्तित्व आणि त्याचा उपदेश यांचा उत्सव साजरा करणे (जाहीरनामा वाचा).

**अधिकृत दिवस** – ३ जुलै २०२१ आणि इथून पुढे दरवर्षी

**कोण सहभागी होऊ शकतो ?** – भारतीय वंशाचे विविध भाषा, संप्रदाय व पृष्ठभूमी असलेले, भारतात व परदेशात राहणारे सर्व ख्रिस्ताचे अनुयायी.

**चळवळ** – भारत आणि जगभरातील विविध भाषिक व पृष्ठभूमी असलेल्या ख्रिस्ताच्या अनुयायांनी तळागाळातील लोकांकरिता केलेले सेवा कार्य.

**उत्सवाची व्याप्ती व स्वरूप** – ३ जुलै हा दिवस स्थानिक पातळीवर व जागतिक पातळीवर येशू भक्ती दिन म्हणून साजरा करणे. संपूर्ण उत्सव अराजनैतिक व बिगर सांप्रदायिक असेल. जिथे शक्य असेल तेथे विविध भाषा व परंपरांना सहभागी होण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

**प्रीतीची कामे** – ३ जूलै २०२१ रोजी शनिवारी समाजाला आशिर्वादीत करणारे कमीतकमी एक तरी काम करण्याचा निर्णय घेणे.

चर्चने तरूण व मुलांना संघटीत करून चर्च बाहेरील समुदायांकरिता “Just One” ही योजना तयार करणे. कुटुंब व व्यक्तिगत पातळीवर समविचारी मित्रांना व कुटुंबातील सदस्यांना संघटीत करून “Just One” ची कृती करणे.

**उत्सवाची कल्पना** –

- गरीब कुटुंबांना अन्न व चांगल्या वस्त्रांचे वाटप करणे.
- रस्ते सफाई, वृक्षरोपण इ. कार्यक्रम आखणे.
- आरोग्य शिबीराचे आयोजन करणे.
- सांस्कृतिक कार्यक्रमांचे (भारतीय संगीत, नृत्य इ.) आयोजन करणे.
- कला, संगीत, वक्तृत्व, लेखन इ. च्या स्पर्धांचे आयोजन करणे.
- रुग्णालये, नर्सिंग होम व तुरूंग यांना भेटी देणे.

**सोशल मिडिया व जागतिक उत्सव** - बॅनर छापणे व पोस्टर्स तयार करणे. सोशल मिडिया प्रोफाईल अपडेट ठेवणे. उत्सवाचे फोटो काढणे, फेसबुक, इंस्टाग्राम इ. ठिकाणी प्रकाशित करणे. लेख व ब्लॉग लिहून जनजागृती करणे.

**साधन पुरवठा** – जाहीरनाम्याची PDF, उत्सवाची मार्गदर्शक तत्वे इत्यादि वेबसाईटवर उपलब्ध – www.indianchristianday.com

अधिक माहितीसाठी कृपया येथे संपर्क साधा – indianchristianday@gmail.com